डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गोलमेज परिषद

डॉ. नथ्थु सिताराम गिरडे
कला व वाणिज्य महा. भिसी
ता. चिमूर जि. चंद्रपूर
9423675881
girdenss@gmail.com

३१ डिसेंबर १६०० मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. पुढे २३ जून १७५७ रोजी मुर्शिदाबाद जवळील प्लासी या ठिकाणी इंग्रज आणि नबाब यांच्यात लढाई झाली. अवघ्या ३२०० इंग्रज सैन्याने ५० हजाराहून अधिक नवाबाच्या फौजेला हरविले. सिराजउद्दौला पळून गेला. पण नंतर मिर जाफरचा मुलगा मिरन यांने त्याला ठार मारले. कोणत्याही प्रकारची लढाई न होता केवळ फितुरी व दगाबाजीच्या भरवशावर इंग्रजांनी बंगाल प्रांत जिंकला. इंग्रजांचा पाया भारतात रोवला गेला तो प्लासीच्या लढाईनेच.[१]

मिर जाफरला इंग्रजांचे वर्चस्व दिवसेंदिवस जाचक ठरू लागले. त्याने इंग्रजाविरूद्ध डचांशी संधान बांधले. परंतु इंग्रजानी डचांनाच पराभूत केले. नंतर मीर जाफरला पदच्युत करून त्याच्या जागी त्यांचास जावई मीर कासीम याला नवाबपद बहाल केले. मीर कासीम महत्वाकांक्षी आणि कर्तबगार होता. प्रशासनातील गोंधळ व भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी त्याने पावले उचलने सुरू केले. सोबतच त्याने अयोध्येचा नबाब शुजाउद्दौला आणि दिल्लीचा बादशहा दुसरा शहाआलम यांच्याशी संधान बांधले. २३ ऑक्टोंबर १७६४ रोजी गाझीपुर जवळील बक्सार येथे लढाईला तोंड फुटले. इंग्रजांनी तिघांच्या संयुक्त फौजेचा पराभव केला. बक्सारच्या लढाईमुळे खऱ्या अर्थाने ब्रिटिश राजवट भारतात सुरू झाली. कारण इंग्रजांना शह देणारी कोणतीही सत्ता आता भारतात राहीली नव्हती.[२]

ब्रिटीशांचे शासन भारतात स्थापन झाल्यापासून भारतात ब्रिटीशांनी अनेक प्रकारच्या सुधारणा करायला सुरूवात केली होती. त्यामध्ये ब्रिटीशांनी भारतात असणाऱ्या अनेक वाईट चालीरिती, प्रथा, परंपरा बंद केल्या होत्या. त्यामुळे काही वेळा सुरूवातीला त्यांना अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागला. भारतात असलेल्या वर्ण व्यवस्थेच्या विरोधात त्यांनी काम करतांना ब्राह्मणेत्तर वर्गाच्या बाबतीत सुधारणा करत असतांना त्यांना खुप त्रास झाला. कारण ब्राह्मण वर्ण हा इतर तीन वर्णामध्ये सुधारण होऊ नये, त्यासाठी खुप प्रयत्न करीत होता. इतर वर्णाच्या बरोबरीत येऊ नये, त्यांची पिळवणूक होत राहावी. यासाठी त्यांना या बदलाला विरोध केला होता. परंतु काही सुशिक्षित तरूणांची पिढी जेव्हा शिक्षण घेऊन बाहेर आली. तेव्हा या सुशिक्षित पिढीने बदल घडविण्यासाठी पेपर, पुस्तक, सभा, भाषणाद्वारे बदल घडविण्यासाठी सुरूवात केली. या बदलाला होत असलेली सुरूवात मोडून काढावी हीच भावना उच्च वर्णियाची होती. काही वेळा ब्रिटीशांनी त्यांच्या विरोधासाठी कायदे केले आणि त्या वाईट प्रथा बंद केल्या.[३]

ब्रिटीशानी भारतात राबविलेल्या धोरणामध्ये डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांनी भारतातील केलेल्या अनेक कार्यामध्ये दलित व अस्पृश्यासाठी जे आपले योगदान दिले आहे, ते योगदान त्यांनी मांडलेल्या अनेक ग्रंथामध्ये भाषणामध्ये आहेच. परंतु डॉ. आंबेडकरांनी ब्रिटीशांनी बोलविलेल्या सवलतीच्या संदर्भात व नियमावलीसाठी घेतलेल्या तीन गोलमेज परिषदेपैकी दि. १२ नोव्हेंबर १९३० रोजी लंडन येथे भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेचे अध्यक्ष 'पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड' तर ब्रिटीश सम्राट 'पंचमजॉर्ज' यांनी उद्घाटन केले. एकूण या परिषदेत घेण्यात आलेल्या बैठका 'दोन महिने सात दिवस' म्हणजे १९ जानेवारी १९३१ पर्यंत चालल्या. यामध्ये संघराज्य स्थापनेपासून तर स्वराज्य मिळेपर्यंत मागण्या मांडण्यात आल्या होत्या. जवळपास

१८ वेळा डॉ. आंबेडकरांनी या ठिकाणी आपले विचार मांडण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणाच्या दरम्यान इंग्रजांची साम्राज्य वादाची निती उघडपणे मांडतांना भारतातील हिंदू व मुस्लीम नेत्यांना आपल्या भाशषणातून उपदेश केला होता. त्या ठिकाणी उपस्थित असणारे डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणाला मदत करणारे बडोदा संस्थानचे राजे 'महाराजा सयाजीराव गायकवाड' यांना त्यांच्याबद्दल गर्व वाटत होता. त्यांनी आपल्या सहकार्यांना आनंदाच्या भरात भोजनासाठी निमंत्रण दिले. खरोखरच अप्रतिम असच घडत होत. या परिषदेची सर्व सूत्र साम्राज्य वादाचे पुरस्कर्ते रॅम्से मॅक डोनॉल्ड यांच्या हाती होती. ही परिषद इतिहास घडवून नवीन दिशा देणारी होती.

परिषदेचे प्राथमिक कामकाज १७ ते २१ नोव्हेंबर १९३० रोजी 'सेंट जेम्स पॅलेस' येथे भरविण्यात आले. यामध्ये भारतातील काही विषयांचा उल्लेख करतांना 'हिंदू महासभेचे डॉ. बा.सी. मुंजे, मुस्लीम लिंगचे बॅ. जिना आणि काही प्रतिनिधींनी' ब्रिटीश समुहातील इतर घटकाप्रमाणे आपणास दर्जा प्राप्त झाला पाहिजे, असे मत मांडले. भारतीय अस्पृश्यांच्या बाजूने २० नोव्हेंबर १९३० रोजी डॉ. आंबेडकरांना संधी देण्यात आली. त्यांनी अगोदरच राव बहादूर श्रीनिवास यांच्याशी चर्चा केली होती. सर्वांना हिच उत्सुकता वाटत होती, डॉ. आंबेडकर अस्पृष्यांबद्दल काय मत मांडतात परंतु डॉ. आंबेडकरांनी ही सुवर्ण संधी समजून अस्पृश्यांना न्याय देतांना छत्रपती शिवाजी महाराजांनी औरगंजेब बादशहाच्या कैदेतील प्रसंगातून न भिता सुटायचे कसे, हा प्रसंग आठवून आपले मत मांडण्याचे ठरवले. दृढ निश्चयाने इंग्रजी भाषेत भाषणाला सुरूवात केली. भारताच्या १/५ ब्रिटीश असलेले 'क्मचमेमक ब्सेंमे' हा जनसमूदाय अस्पृश्य म्हणून ओळखला जातो. तो मुस्लिमांपेक्षा वेगळा आणि हिंदूंच्यात असूनही वेगळा आहे. परंतु हिंदू म्हणून समजल्या गेलेल्या इतर दुसरा दर्जा असलेली अनेक समाज समुह आहेत. एका अर्थाने अस्पृश्य समाज 'मॅसदिकेसंअम' कूळ व गुलाम या दोन अवस्था मधील दर्जा आहे. त्यांचा शारीरिक स्पर्श महारोग्याच्या स्पर्शासारखाच अपायकारक व त्याज्य मानला जातो. त्यांना मूलभूत अधिकारही नसून सार्वजनिक ठिकाणी फिरण्यासही बंदी आहे. असे भयंकर स्वरूप आहे.[४]

स्वातंत्र्यासाठी डॉ. आंबेडकीरांनी ब्रिटीश सरकारवर केलेला हल्ला पाहून केसरी वृत्तपत्राने असा टोमणा मारला की, जसा सिझरवर त्याचा मित्र ब्रुटस उलटला. तसे ब्रिटीशांवर डॉ. आंबेडकर उलटले. ही परिषद ब्रिटीश मसुदयांशी विचार विनिमय करण्यासाठी बोलावलेली अपूर्व अशी परिषद होती. तेज बहादुर सप्रु यांनी आपले मत मांडतांना ब्रिटीश समुहातील तीन घटकांच्या बरोबरीने आपणास दर्जा प्राप्त झाला पाहिजे, अशी भारताची मागणी आहे. बिकानेरचे महाराज यांनी आपल्या मतामध्ये मागणी करतांना स्वयंशाशित एक संघ अशा ब्रिटीश अंमलाखाली भारताशी संस्थानिक संयुक्त पद्धतीची राजपद्धती स्वीकारण्यास तयार आहे. त्याचे समर्थन पतीयाळाचे नरेश व भोपाळचे नवाब यांनी केले. त्यानंतर परिषदेपुढे एक प्रतिनिधी अत्यंत गंभीर मुद्रेचा सदृढ बांध्याच्या, उत्तम कपडयाचा व सतेज डोळयाचा बोलण्यासाठी उभा राहिला, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. भारतात राहणाऱ्या अज्ञ, अर्ध नग्न, दलित आणि भुके कंगाल दलितांचा नेता आणि त्राता. ते काय बोलणार याकडे सर्वाचे लक्ष लागले. भारतातील सरकार हे लोकांनी, लोकांकरिता चालविलेले लोकांचे राज्य असावे, अशी घोषणा करताच उपस्थितांना आश्चर्याचा धक्का बसला. परिषदेकडे नजर फिरवित ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी जी कारूण्य स्थिती होती. त्यामध्ये थोडाही फरक झालेला नाही. आम्ही संधीची वाट पाहत आहोत. त्यातील एकाही प्रश्नावर न्याय दिला काय तर याचे उत्तर नाही, असेच आहे. अस्पृश्यांचे दु:ख कमी झालेले नसून प्रश्न तसेच आहेत. 'असले सरकार काय कामाचे' असा प्रश्न त्यांनी ब्रिटीश प्रतिनिधीकडे पाहून विचारला.

ब्रिटीशांनी निवडलेल्या प्रतिनिधीमध्ये सर्व सामान्याचे २० प्रतिनिधी, मुस्लीमांचे १६, हिंदु महासभेचे ०३, शिखांचे ०२, ख्रिश्चनांचे ०१, अब्राहमनांचे ०४, दलितांचे ०२, जमिनदारांचे ०४, युरोपियनांचे ०४,

ॲल्गो इंडियन्स ०१, भारतीय कारखानदार यांचा ०१ प्रतिनिधी व संस्थानांचे १६ असे जात, धर्म, वंश यांच्या आधारे प्रतिनिधी निवडल्या गेले. या निवडीतून भारतीय समाजाची भिन्नता दाखवून खरे रूप मांडण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट झाला. मुस्लिमांचे दोन जहाल प्रतिनिधी महंमद शफी, आगा खान, कट्टर मुस्लीम नेते फझल हुसैन, यांनी निवडले. या सर्वांचा विचारातून कोणाचेही एकमत झाले नाही. बैठीकीतून मुस्लीमांना चिथावणी देण्याची ब्रिटीशांची निती समोर येत होती. साम्राज्यवादी गट मुस्लीम प्रतिनिधीच्या विचारांचे समर्थन परिषदेबाहेर करत असल्याचे चित्र स्पष्ट झाले. केंद्र शासनात ३०% जागा देण्यात याव्यात अशी मागणी केली गेली. या परिषदेत बॅ. महंमद अली जिना यांचे वाक्य असे होते की, ''मी प्रथम मुस्लीम आहे, आणि नंतर भारतीय आहे.'' हे विचार राष्ट्रवादाला जबरदस्त धक्का देणारे होते. या ठिकाणी काही उपस्थित काही मुस्लीमांना खास राजकीय सवलती मिळाल्याखेरीज कोणतीही घटना मुस्लीमांना मंजुर नाही. हेच ब्रिटीश साम्राज्यवादाला पोषक वातावरण भारतात होते. त्यांनी मुस्लीमाच्या विचारांना प्रोत्साहन दिले. शिखांनीही आपल्या मागण्या लावून धरल्या होत्या. डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या बाजूने आपले मत मांडतांना स्वतंत्र मतदार संघाची मागणी लावून धरली होती. या बैठकीमध्ये कोणतेही ठोस निर्णय या सभ्रमावस्थेमुळे घेतले गेले नाही. मात्र एकमेकांबद्दल द्वेष भारतीयाच्या मनात निर्माण झाला. समारोपीय भाषणात पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी संघराज्यात्मक भारताची ग्वाही देऊन प्रातांत जबरदस्त शासन पध्दती देण्याचे सुचित केले. नविन सुधारणा होईपर्यंत अल्पसंख्यांकाना भारतातील प्रमुख गटाच्या प्रतिनिधींना एकत्र बोलावून समस्या सोडविल्या जातील असे सांगितले.[५]

अस्पृश्याबद्दलच्या मागण्या किती योग्य पध्दतीने मांडल्या जात होत्या. त्यांना न्याय मिळावा, हीच अपेक्ष मनाशी ठेवून डॉक्टरांनी आपले मत मांडले परंतु गांधीजीनी त्यांचे भावनेची जराही जाणिव होऊ दिली नाही. भावना समजण्याचा साधा प्रयत्नही केला नाही. त्यांनी अस्पृश्यांची चेष्ठा केल्याचे समजते. प्रश्न सोडविण्याऐवजी वाढल्याचे जाणवते. त्यांच्या कृत्यामुळे जरी गांधीजीना वाटत असेल, तरीही ते त्या ठिकाणी स्वत: संपवित होते. त्यांची ही निती त्यांच्याच अपयशाचे कारण ठरली. गांधीजीना राष्ट्रीय कॉग्रेसच्या वतीने राष्ट्रहित व राष्ट्र गौरवाची मागणी घातली होती. यातून फक्त गांधीजीनी हेच सिध्द केले की, प्राण गेले तरी बेहत्तर पण अस्पृश्यांना स्वतंत्र असे काही मिळू देणार नाही, ही भूमिका गांधीजीनी घेतली. गांधीजीच्या एका मताशी डॉ. आंबेडकरांनी सहमती दाखविली. प्रातिक सरकार हे केंद्रीय सरकारला जबाबदार असावे, या प्रश्नावर चर्चा होणार होती. परंतु ती झाली नाही. त्यांच्या या विचाराबद्दल जगजेता 'जुलियस सिझर' च्या गौळ प्रातांतील स्वारीचे वर्णन असे आहे, सिझर आला त्याने पाहिले व त्यांने जिकंले. परंतु याच्या उलट गांधीजीचे झाले. गांधीजी आले, गांधीजीनी पाहिले. गांधीजीच्या वृत्तीमुळे लोकशाहीला धक्का पोहचणार होता. या परिषदेमध्ये कॉग्रेसने अल्पसंख्याक समाजाला पाठींबा दिला नसता तरी चालले असते. परंतु गांधीजीच्या विचारांचे अल्पसंख्याक समाजाला ईजा पोहचून दूर लोटले होते. हा समाज कॉग्रेस पासून दूर चालला आहे, हे स्पष्ट झाले. या विचारांने गांधीजी अत्यंत अस्वस्थ झाले. डॉ. आंबेडकरांनी गांधीजींना विचारले की, तुम्ही मुस्लीमांना व शिखांना जे देता ते अस्पृश्यांना का देत नाही. यावर ते चिडतात, योग्य उत्तर देऊ शकत नाही, फक्त असे म्हणतात, अस्पृश्यांना जर स्वतंत्र मतदार संघ दिले तर ते अस्पृश्यच राहतील. म्हणून मी अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व व खास सवलत देण्याचे विरोधी आहे व हिंदू यांचे संबंध जवळचे आहे, असे गांधीजी म्हणाले. परंतु मुस्लीमांबरोबर गुप्त चर्चा करून मुस्लीमांच्या १४ मागण्या मान्य करतो. पण अल्पसंख्याकांनी आणि अस्पृश्यांनी स्वतंत्र मतदार संघ मागू नये. अशी भूमिका घेतली पाहिजे. हे विचार न पटण्यासारखे आहे. पण याचा पुरावा डॉ. आंबेडकराच्या कचेरीत आहे. गांधीजी मुस्लीमांना पाठींबा देण्यासाठी आगा खान यास त्याचे निवासस्थानी जाऊन भेटले. रस्त्याने जातांना कुराणाची प्रत घेऊन गेले. परंतु आगा खान गांधीजींना म्हणाल्या अस्पृश्य समाज खुप दुबळा आहे, त्यांना सर्व सहाय व हक्क मिळाले पाहिजे,

मुस्लीमांपेक्षा त्यांची गरज जास्त आहे, हे मी जाणतो. गांधीजी निराश होऊन परतले. मला तुम्ही महात्मा सारखी पदवी देऊ नका, कारण ते जे बोलतात, ते सर्व मान्य, जे करतात तेही सर्व मान्य, परंतु तुम्ही मला पदवी देऊन अंध भक्त होवू नका, पुढाऱ्यावर विसंभू नका, तुम्ही स्वयंप्रज्ञ व्हा, भारतामध्ये सर्वात वाईट प्रवृत्तीच्या लोकांनी डॉ. आंबेडकरांबद्दल अज्ञान असतांना गांधीजीच्या प्रती त्यांची आस्था असल्याकारणाने डॉ. आंबेडकरांना देशात दुफाळी निर्माण करणार अशी प्रतिमा निर्माण केली. त्या लोकांना डॉ. आंबेडकरांनी विनंती केली. त्यांनी राष्ट्रासाठी काहीतरी केले आहे, जर ही गोष्ट पटत नसेल, तर मी त्यांना थोडीही किंमत देत नाही. याच्याच उलट दलित बांधवांना डॉ. आंबेडकरांच्या कार्यावर पूर्णपणे विश्वास आहे, ही गोष्ट महत्वाची आहे.[६]

डॉ. आंबेडकरांनी टिकाकारांच्या टिकेला न जुमानता दलित बांधवासाठी केलेले कार्य आणखी जोमात करण्याची तयारी दाखविली व ते कार्य पुढे ठेवले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाची दशा बदलतांना नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह यातून हेच दाखवून दिले आहे की, प्राण्यापेक्षाही माणसाला दिली जाणारी वागणूक अत्यंत घृणास्पद अशा स्वरूपाची आहे. यामध्ये जोपर्यंत सुधारणा होणार नाही. तोपर्यंत मी हे कार्य अविरतपणे सुरूच ठेवणार आहे, या विटाळातून दलितांना देऊळातील प्रवेश किंवा पाण्यासाठीचा लढा नसून हा लढा सामाजिक बांधीलकीचा नसून हा फक्त राजकीय सत्तेकरीता केलेला प्रयत्न आहे. हिंदू धर्माबद्दल आलेला तिटकारा व्यक्त करतांना डॉ. आंबेडकरांनी हे अतिशय वाईट चित्र मांडलेले आहे. या अस्पृश्यांच्या लढयात कोणत्याही त्रासाला न जुमानता त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. याच प्रयत्नामुळे आज अस्पृश्यता नष्ट झाली आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१. वैद्य डॉ. सुमन, काटेकर डॉ. शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास', साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. पवार डॉ. जयसिंगराव, 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र चळवळीचा इतिहास', निराली प्रकाशन, पुणे
३. ग्रोवर बी. एल. यशपाल, 'आधुनिक भारत का इतिहास', एस चंद्र एण्ड कंपनी लि. नई दिल्ली
४. Bhise Dr. R.M., 'Mahatma Gandhi Ideology In the Present Scenario', Prashant Publication
५. 'राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे व आज्ञापत्र', संपादक, प्रदिप गायकवाड
६. 'शिक्षा व लोकतंत्र', जॉन डिवी, अनुवादक लाडली मोहन माथुर